# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ०७-२३** **दिनांक ०७/०१/२०२३**

## महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी राबविण्यात येणार 'पुन:धैर्य योजना'

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथे महिलांच्या प्राप्त तक्रारींचे अनुषंगाने सखोल व यथोचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीकोनातून 'पुन:धैर्य योजना' राबविण्यात येणार आहे. पोलीस ठाणे येथे महिलांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशीचे अनुषंगाने तक्रारदार व गैरअर्जदार यांना समक्ष पोलीस ठाणे येथे बोलावून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते किंवा काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये समेट किंवा तडजोड होवून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येते. मात्र काहि प्रकरणांमध्ये सदरच्या तक्रारी निकाली काढल्यानंतर थोडया दिवसानंतर तक्रारदार महिलांना गैरअर्जदार यांच्याकडून परत त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्याकरिता पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार 'पुन:धैर्य योजना' राबविण्यात येणार असून आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथे मागील एक वर्षापासून प्राप्त तक्रारींमधील महिलांना पोलीस ठाणे येथे बोलावून किंवा त्यांचेशी संपर्क करुन सध्या त्यांना गैरअर्जदार यांच्याकडून कुठल्याही प्रकारचा त्रास अथवा छळवणूक होत असल्यास त्याबाबत विचारणा करण्यात येवून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

सदरचा उपक्रम दर शनिवारी राबविण्यात येणार असून महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे मार्फतीने तक्रारी हाताळण्यात येणार आहे. विभागीय सहा. पोलीस आयुक्त यांचे पर्यवेक्षण व परिमंडळीय पोलीस उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची योजना राबविण्यात येणार असून पोलीस आयुक्त या योजनेचा आढावा घेणार आहे.

--------------ooooo--------------